कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदल्या व नियुक्त्या.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन आदेश क्रमांकः एलटीएस-१११७/(४४९/२०१७)/आ (वर्ग-१)..(१)

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.

तारीख: २० नोव्हेंबर, २०१७.

शासन आदेश :-

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार व सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेने जलसंपदा विभागातील कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदलीने नियुक्त्या / पदस्थापनेत बदल खाली दर्शविल्याप्रमाणे करण्यात येत आहेत:-

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव सर्वश्री.	सध्या धारण करीत असलेले पद	बदलीने नियुक्तीचे पद	अभिप्राय
१	२	३	४	५
१.	संजय मरीबा तुपसौंदर	कार्यकारी अभियंता, गुण नियंत्रण विभाग, पुणे.	कार्यकारी अभियंता, जलविद्युत विभाग क्र.२, पुणे.	बदली अधिनियमातील कलम ४(४) व ४(५) नुसार रिक्त पदी. (विनंतीनुसार)
२.	श्रीमती सविता आनंदराव गांगुर्डे	उप अधीक्षक अभियंता, गुण नियंत्रण मंडळ, पुणे.	कार्यकारी अभियंता, गुण नियंत्रण विभाग, पुणे.	बदली अधिनियमातील कलम ४(५) नुसार श्री.तुपसौंदर यांच्या बदलीने रिक्त होणाऱ्या पदी.
३.	आर.पी. फुलंब्रीकर	कार्यकारी अभियंता, जलविज्ञान प्रकल्प विभाग, औरंगाबाद.	कार्यकारी अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) विभाग, बुलढाणा.	बदली अधिनियमातील कलम ४(५) नुसार रिक्त पदी.
४.	संजय महादेवराव निवल	कार्यकारी अभियंता, अमरावती प्रकल्प बांधकाम विभाग क्र.१, अमरावती.	कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, पुसद (बांधकाम).	बदली अधिनियमातील कलम ४(५) नुसार रिक्त पदी. (विनंतीनुसार)
५.	सं.दे.वानखेडे	सहायक मुख्य अभियंता (वि.प्र.), अमरावती.	कार्यकारी अभियंता, अमरावती प्रकल्प बांधकाम विभाग क्र.१, अमरावती.	बदली अधिनियमातील कलम ४(५) नुसार श्री.निवल यांच्या बदलीने रिक्त होणाऱ्या पदी.
६.	अभय गोविंद काटकर	कार्यकारी अभियंता, बांधकाम व्यवस्थापन संगणकीकरण विभाग, पुणे.	उप अधीक्षक अभियंता, सातारा सिंचन मंडळ, सातारा.	बदली अधिनियमातील कलम ४(५) नुसार रिक्त पदी. (विनंतीनुसार)

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव सर्वश्री.	सध्या धारण करीत असलेले पद	बदलीने नियुक्तीचे पद	अभिप्राय
७.	प्रशांत पुरुषोत्तम संत	कार्यकारी अभियंता, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद.	कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग, पैठण, नाथनगर (उत्तर) , जि.औरंगाबाद.	बदली अधिनियमातील कलम ४(५) नुसार रिक्त पदी. (विनंतीनुसार)
८.	श्रीमती सोनाली सुदेश चोपडे	कार्यकारी अभियंता, भंडारा पाटबंधारे विभाग, भंडारा (सिंचन).	सहायक मुख्य अभियंता (२), मुख्य अभियंता,जलसंपदा विभाग, अमरावती.	बदली अधिनियमातील कलम ४(४) व ४(५) नुसार रिक्त पदी.
९.	श्रीमती रजनी सचिन देशमुख	कार्यकारी अभियंता, संपदा अभियांत्रिकी केंद्र, नाशिक.	कार्यकारी अभियंता, निम्न तापी प्रकल्प विभाग, अमळनेर, जि.जळगांव.	बदली अधिनियमातील कलम ४(५) नुसार श्री.रा.गो.पाटील यांच्या प्रतिनियुक्तीने रिक्त होणाऱ्या पदी.

२. उपरोक्त अधिकाऱ्यांच्या बदलीने रिक्त होणाऱ्या पदावर अन्य अधिकांऱ्याच्या नियुक्तीबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

३. सदर नियुक्ती/पदस्थापना दिलेल्या अधिका-यांना आपल्या नवीन नियुक्तीच्या जागी हजर होण्यास तात्काळ कार्यमुक्त करावे. तसेच, अ.क्र.९ येथील श्रीमती देशमुख यांना श्री.रा.गो.पाटील यांचे प्रतिनियुक्तीचे आदेश निर्गमित झाल्यानंतरच सध्याच्या पदावरून कार्यमुक्त करण्यात यावे.

तसेच, संबंधीत अधिकाऱ्यांना नवीन नियुक्तीच्या जागी हजर होण्यासाठी कोणत्या दिनांकास कार्यमुक्त केले आणि ते नवीन नियुक्तीच्या जागी कोणत्या दिनांकास हजर झाले याबाबत शासनास doesttclass1.wrd@maharashtra.gov.in या ई-मेल संकेतस्थळावर त्वरित कळवावे.

४. संबंधीत अधिकाऱ्यांना शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणत्याही कारणास्तव रजा मंजूर करु नये. तसेच म.ना.से. (रजा) नियम, १९८१ मधील नियम-३० (सी) नुसार मूळ कार्यालयाने बदली झालेल्या अधिकाऱ्याचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्विकारु नयेत. असे अर्ज प्राप्त झाल्यास, ते संबंधीत अधिकाऱ्यास मूळ पत्त्यावर नोंदणी पोच देय डाकेने परत करावेत. मूळ कार्यालयाकडे बदली झालेल्या अधिकाऱ्याचे रजेचे अर्ज पाठविल्यास सदर अर्जाची दखल घेण्यात येणार नाही.

५. सदरहू बदली आदेशानुसार तात्काळ नियुक्तीच्या ठिकाणी हजर न झाल्यास वा कोणत्याही प्रकारचा दबाव आणून बदली रद्द करण्याचा प्रयत्न झाल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक)

नियम १९७९ मधील नियम २३ चे उल्लंघन करणारी असल्यामुळे, ती गैरवर्तणूक समजून त्यांचे विरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

६. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक **२०१७११२०१२३९३६६८२७** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vijay K. Chaudhari

Digitally signed by Vijay K. Chaudhari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d242787d25852443527f4a3927a849feec29ce26368b8badbee9e69852845f0a, cn=Vijay K. Chaudhari
Date: 2017.11.20 13:16:34 +05'30'

(वि.का.चौधरी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. प्रधान सचिव (जलसंपदा)/ सचिव (जलसंपदा व्यवस्थापन व लाक्षेवि) / सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. प्रधान सचिव, मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. सर्व कार्यकारी संचालक / महासंचालक, जलसंपदा विभाग.
४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद
५. सर्व मुख्य अभियंता व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई .
६. सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग.
७. मुख्य अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण), पुणे.
८. महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता), १-मुंबई / २-नागपूर.
९. सर्व अधीक्षक अभियंता (स्थापत्य), जलसंपदा विभाग.
१०. खाजगी सचिव, मा. मंत्री (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई.
११. खाजगी सचिव, मा. राज्यमंत्री (जलसंपदा),मंत्रालय, मुंबई.
१२. संबंधीत अधिकारी.
१३. संबंधीत जिल्हा कोषागार अधिकारी.
१४. सह सचिव (सेवा) / अवर सचिव (सेवा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. सर्व कार्यासने जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई .
१६. कार्यासन आ (वर्ग-१), संग्रहार्थ.